Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# बीड जिल्ह्यातील वाहतूक व दळणवळणः एक अभ्यास

**डॉ. एम.जी. राजपंगे**
भूगोल विभाग, आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा ,
ता. आष्टी, जि. बीड

**प्रस्तावनाः**

वाहतूक व दळणवळन हा घटक कोणत्याही प्रदेशाच्या विकासामध्ये अत्यंत महत्वाचा घटक आहे. बीड जिल्हा वाहतूक आणि दळणवळनाच्या क्षेत्रात फारसा प्रगतशिल नाही. बीड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने वाहतूकीमध्ये रस्त्यांची भूमिका महत्वाची आहे व याच मार्गाचा मोठा वापर असून रेल्वे वाहतूक फक्त एकाच ठिकाणी म्हणजेच परळी ते हैद्राबाद हा एकच रेल्वेमार्ग असून त्याची जिल्ह्यात लांबी ४७.८६ किमी आहेत या मार्गावर परळी, आंबालाटेक, घाटनांदूर, मूर्ती व पाणगांव ही स्थानके आहेत. हा मार्ग रेल्वेचा अखत्यारित आहे. जिल्ह्यात विमान व जलवाहतूक उपलब्ध नाहीत.

दळणवळण व संदेशवहनाच्या बाबतीत म्हणावा तसा विकास झालेला नाही. म्हणून या सर्वांचा परिणाम बीड जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर झालेला दिसून येतो.

**रस्ते वाहतूक :**

बीड जिल्ह्यात रस्ते वाहतुक हीच एकमेव सुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्ते इ. चा समावेश होतो. तर रेल्वे वाहतूक जिल्ह्याच्या पूर्व भागात म्हणजेच परळी तालुक्यात कमी प्रमाणात उपलब्ध आहे. बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतुकीचा तपशील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील रस्ते वाहतूक (सन १९९१ व २०११)**

| अ. क्र. | मार्गाचे नांव | रस्त्यांची लांबी कि.मी. मध्ये | |
|---|---|---|---|
| | | १९९१ | २०११ |
| १ | राष्ट्रीय महामार्ग | - | १८८ |
| २ | राज्य महामार्ग | ९१९.६४ | १००३ |
| ३ | प्रमुख जिल्हा रस्ते | २८६७.०८ | ३४४९ |
| ४ | ग्रामीण रस्ते | १५३६.८९ | ४८१२ |
| एकूण | | ५३२३.५८ | ९४५२ |

स्त्रोत: बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन - १९९१ व २०११

तक्ता क्र. १ नुसार बीड जिल्ह्यातील सन १९९१ व २०११ या वर्षीची रस्ते वाहतूकीची माहिती दिलेली आहे. सन १९९१ ला बीड जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी ५३२३.५८ किमी. तर सन २०११ मध्ये ९४५२ किमी लांबी होती. सन १९९१ ला जिल्ह्यात राज्य महामार्ग (९१९.६४ किमी), जिल्हा प्रमुख रस्ते (२८६७.०८ किमी) व ग्रामीण रस्ते (१५३६.८९ किमी) होते तर सन २०११ मध्ये राष्ट्रीय महामार्ग (१८८ किमी.), राज्य महामार्ग (१००३ किमी) प्रमुख जिल्हा रस्ते (३४४९ किमी) व ग्रामीण रस्ते (४८१२ किमी) होते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

तक्ता क्र. २

**बीड जिल्ह्यातील प्रमुख रस्ते**

| अ. क्र. | रस्ता क्र. | रस्त्याचे नांव | लांबी (किमी) |
|---|---|---|---|
| १ | म.रा.मार्ग क्र. १ | सोलापूर-औरंगाबाद-धुळे (चौसाळा-बीड-गेवराई मार्गे) | १४८ |
| २ | म.रा.मार्ग क्र. २ | मुंबई-अहमदनगर-नांदेड-सिरोंचा (बीड-वडवणी-सिरसाळा-परळी मार्गे) | १८७ |
| ३ | म.रा.मार्ग क्र. ४४ | शहापूर-संगमनेर-शेवगांव-पुर्णा-नांदेड-धर्माबाद (गेवराई-माजलगांव) | ७० |
| ४ | म.रा.मार्ग क्र. ५५ | वडगांव-चाकण-श्रीगोंदा-जामखेड-बीड (सौताडा-बीड मार्गे) | ६१ |
| ५ | म.रा.मार्ग क्र. ६८ | बारामती-भिगवण-पाथर्डी (कडा-सिरसाळा मार्गे) | ४५ |
| ६ | म.रा.मार्ग क्र. १४२ | नगर-जामखेड-कडा-भूम (कडा-आष्टी मार्गे) | ५८ |
| ७ | म.रा.मार्ग क्र. १४४ | तीसगांव-पाथर्डी-धारुर-लातूर (धारुर-लोखंडी सावरगांव मार्गे) | ७७ |
| ८ | म.रा.मार्ग क्र. १५३ | टाकळी-पाटोदा-भूम-गरदेवाडी (पादोदा मार्गे) | ६९ |
| ९ | म.रा.मार्ग क्र. १५६ | जामखेड-अहमदपूर (पाटोदा-मांजरसुंबा केज मार्गे) | १८१ |
| १० | म.रा.मार्ग क्र. १५७ | खर्डा-परळी (चौसाळा अंबाजोगाई मार्गे) | १३५ |
| ११ | म.रा.मार्ग क्र. १७३ | तुनकी-खामगांव-शिवणी-रांजणी (जातेगांव-टाकळी मार्गे) | ६८१ |

स्त्रोत: बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन - १९९१ व २०११

तक्ता क्र. २ मध्ये बीड जिल्ह्यातील विविध राज्यमहामार्ग व जिल्हा मार्गांचे विवरण दिले आहे. बीड जिल्ह्यातील सर्वात जास्त लांबीचा राज्य महामार्ग क्र.२ असून त्याची लांबी १८७ किमी इतकी आहे.यानंतर अनुक्रमे राज्यमहामार्ग क्र.१ ते १५७ हे मार्ग असून त्यांची लांबी १४८ किमी व १३५ किमी इतकी आहे. जिल्ह्यात सर्वात कमी लांबीचा राज्य महामार्ग क्र.६८ किमी आहे.

**लोहमार्ग :-**

बीड जिल्ह्यात दक्षिण मध्य रेल्वे विभागाचा लोहमार्ग ४७.८६ किमी असून तो अंबाजोगाई व परळी तालुक्यातून जातो. हा लोहमार्ग ब्रॉडगेज असून यापैकी ४०.३८ किमी हा परळी-हैद्राबाद मार्गावर आहे तर ७.४८ किमी मार्ग परळी-परभणी मार्गावर आहे. २२० कि.मी. चा अहमदनगर - बीड - परळी हा नवीन लोहमार्ग बांधण्याचे काम युध्दपातळीवर चालू असून सन २०१९ पर्यंत ते पूर्ण शासनास्तरावर प्रस्तावित आहे. त्याशिवाय जिल्ह्यात इतरत्र कोणताही लोहमार्ग नाही. बीड जिल्ह्यात हवाई मार्ग व जलमार्ग नाहीत. बीड जिल्ह्यातील मालवाहतूकीसाठी रेल्वेमार्गाची सुविधा मोठ्या प्रमाणात नसल्याने वाहतूक ही प्रामुख्याने रस्ते मार्गावरुन होते. एकंदरीतच बीड जिल्हा हा वाहतुक व दळणवळणाच्या बाबतीत समाधानकारक स्थितीत असल्याचे दिसून येते. जालना - बीड - सोलापुर राज्यमहामार्ग तर काही जिल्हा मार्गही नव्याने तयार करण्यात येत असल्याने जिल्ह्यात वाहतुक व दळणवळणाची स्थिती समाधानकारक असल्याचे निदर्शनास येते.

**संदर्भ:**

१) बीड जिल्हा - सामाजिक व आर्थिक समालोचन, १९९१, २००१, २०१५.

२) बीड जिल्हा - गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई

३) लोकराज्य : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

४) डॉ. व्ही. टी. घारपुरे : लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

५) डॉ. दाते व सौ दाते: प्राकृतिक भूगोल, विदया प्रकाशन, नागपुर

६) प्रा. डॉ. जगदिश सिंह : संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.